## कोर्ट विद्यमान फौजदारी न्यायाधिश, प्रथम वर्ग, नरखेड

**फौजदारी अर्ज क्र. १३६/२०२३**

Exh 32

**रोशनी - विरुध्द - नितीन**

**अर्जदार -** **रोशनी सचिन घारोडीया**
वय 33 वर्षे, धंदा - गृहिणी,
राहणार: पांढरी-गायमुख, तहसिल नरखेड
जिल्हा नागपूर

Exh 32

Order

Applicant is present today in Court and identified by her Ld. Adv. Mr. V. M. Kshirsagar. Respondent No. 1 and 2 are present before the Court along with their Ld. Adv. Mr. S. M. Nafde. Both sides voluntarily agree to the terms of this compromise deed. Hence, this compromise deed is read and recorded.

R. V. Thayil
16/04/2026

**गैरअर्जदार - १)** **श्री. नितीन नामदेव घारोडीया**

**२)** **श्रीमती उर्मीला नामदेवसिंग घारोडीया**
दोन्ही राहणार: ५५, आयचित मंदिर, गरुड खांब,
महाल, नागपूर- ४४००३२.

**आपसी समझोत्याची नोंद घेवून प्रकरण निकाली काढणेबाबत.**

अर्जदार व गैरअर्जदार नम्रतापूर्वक नमूद करतात की;

अर्जदार रोशनी यांचे लग्न गैरअर्जदार क्र. २ यांचा मुलगा नामे सचिन घारोडीया याचे सोबत दिनांक २०.०६.२०२१ रोजी झाले. लग्नानंतर अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ या सुन-सासु या नात्याने एकत्र राहायला लागल्या. दिनांक २५.०५.२०२३. रोजी अर्जदार यांचे पती सचिन नामदेवसिंग घारोडीया यांचा मृत्यू झाला. अर्जदार यांना त्यांचे लग्न सबंधातुन मुलबाळ झाले नाही. काही कौटूंबिक कारणांमुळे अर्जदार व त्यांचे पती सचिन घारोडीया यांच्यात वाद झाल्यामुळे जुलै २०२२ पासुन अर्जदार हया त्यांच्या पतीपासुन उपरोक्त पत्यावर त्यांचे आईवडीलांकडे आजही राहत आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ यांच्यात आपसी समझौता झाला आहे. गैरअर्जदार क्र. २ हया अर्जदार

Civil Court, Narkhed

यांना आज रोजी रुपये १३,००,०००/- (रुपये तेरा लाख रुपये फक्त) दिले आहे.

खालील वर्णनाची मालमत्ता लिहून घेणार तसेच त्यांची तीन मुले नामे मनोज नामदेव घारोडीया, नितीन नामदेव घारोडीया आणि सचिन नामदेव घारोडीया यांच्या नावे महानगर पालिका, नागपूर व सिटी सर्व्हे अभिलेखात दर्ज आहे. अशा प्रकारे गैरअर्जदार क्र. २ यांचा खालील वर्णनाच्या मालमत्तेत १/४ हिस्सा व त्यांचा मुलगा सचिन याचा १/४ हिस्सा आहे. गैरअर्जदार क्र. २ यांचा मुलगा सचिनचे मृत्यूनंतर त्याच्या १/४ हिस्सात गैरअर्जदार क्र. २ व अर्जदार यांना हिंदू वारस हक्काने समान हिस्सा प्राप्त झाले. अशा प्रकारे, अर्जदार यांचा खालील वर्णनाच्या मालमत्तेत १/८ हिस्सा आहे. दोन्ही पक्षात आपसी समझौता झाल्यामुळे व गैरअर्जदार क्र. २ या अर्जदार यांना रुपये १३,००,०००/- (रुपये तेरा लाख रुपये फक्त) दिले असल्यामुळे अर्जदार या गैरअर्जदार क्र. २ यांना त्यांचा खालील वर्णनाच्या मालमत्तेतील १/८ हिस्सा गैरअर्जदार क्र. २ यांच्या नावे हक्क सोडून देत आहे. दोन्ही पक्षात आपसी समाझौता झाल्यामुळे तसेच अर्जदार यांना गैरअर्जदार क्र. २ यांच्या नावे हक्क सोडून द्यायचा असल्यामुळे अर्जदार यांनी स्वत:च्या नावाचा फेरफार घेण्याबाबत कुठलीही कार्यवाही केलेली नाही.

## स्थावर मालाचे वर्णन

१) खास मौजा नागपूर येथील नगर भूमापन क्रमांक १९०, शिट क्रमांक. २६९, क्षेत्रफळ १६७ चौरस मिटर, नागपूर महानगरपालिका घर क्रमांक २५५, वार्ड क्रमांक २५, प्रभाग क्रमांक २२.

२)  शेत सर्व्हे क्रमांक १४७, आराजी १.२२ हेक्टर आर, आकारणी ४.३३, खाते क्रमांक ६०, मौजा विहीरगांव, तहसिल व जिल्हा नागपूर.

आज रोजी गैरअर्जदार क्र. २ यांनी अर्जदार यांना भारतीय स्टेट बँक, महाल शाखा, नागपूर येथील चेक क्र. 517341 —— रू. १३,००,०००/- (अक्षरी रूपये तेरा लाख फक्त) दिलेला आहे व सदर्हू रक्कम अर्जदार यांना प्राप्त झाल्याचे मान्य व कबुल आहे. (चेक- रोशनी अरमानसिंग सुर्यवंशी या नावाने दिला आहे)

या बदल्यात उपरोक्त मालमत्तेपैकी अर्जदार यांचा १/८ अविभक्त हिस्साचा हक्क गैरअर्जदार क्र. २ यांना देत आह.

आपसी समझोत्याप्रमाणे वरील मालमत्तेपैकी अर्जदाराचे हिस्यातील १/८ अविभक्त हिस्सा गैरअर्जदार क्र. २ पूर्णपणे मालक व हक्कदार झाले आहे. अर्जदार यांचे मालकी हक्क वरील मालमत्तेमधुन नष्ट झाले आहे. आता गैरअर्जदार क्र. २ त्यांचे मर्जीप्रमाणे पाहिजे तशी वहीवाट, विल्हेवाट, उपभोग, फायदा त्यांनी घेत जावा व निमसरकारी, सरकारी कार्यालय, इत्यादी ठिकाणी आपले नाव दर्ज करून घ्यावे.

वरील स्थावर मिळकतीसंबंधी पुढे चालून अर्जदार किंवा त्यांचे कोणतेही इस्टेट वारसान यांना कोणतेही दावे वा उजर केल्यास ते या लेखान्वये रद्द व बेकायदेशीर समजण्यात येईल.

गैरअर्जदार क्र. २ यांनी शेत सर्व्हे क्र. १४७, मौजा विहिरगाव या शेतावर स्वत:च्या नावाचा फेरफार घेतलेला आहे याची संपूर्ण माहिती अर्जदार यांना आहे. अर्जदाराला सदर फेरफाराबद्दल कोणताही आक्षेप नाही तसेच भविष्यात सुध्दा राहणार नाही. तसेच हा आपसी समझोता लक्षात घेता नागपूर येथील भूमापन क्र. १९०, शीट क्र. २६९, नागपूर

R. Shaoodiya
उर्मिला नामदेवराव धारोडिया
R. Shaoodiya
15.04.2026

महानगर पालिका घर क्र. २५५, वार्ड क्र. २७, प्रभाग क्र. २२ या मालमत्तेवर गैरअर्जदार क्र. २ यांचे नावाची नोंद सचिन घारोडिया यांचे नाव कमी करून स्वत:च्या नावाची नोंद करून घ्यावी याकरिता अर्जदाराला कुठलाही आक्षेप नाही.

भविष्यात कुठल्याही प्रकारची आवश्यकता भासल्यास अर्जदार या कोणताही अतिरिक्त मोबदला न घेता गैरअर्जदार क्र. २ यांचे नावाने नोंदणीकृत दस्ताऐवज करून देतील याबाबत अर्जदार हे हमी देतात.

**प्रार्थना** - करिता नम्र विनंती आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या दरम्यान झालेल्या आपसी समझोत्याची नोंद घेऊन सदर प्रकरण निकाली काढण्यात यावे.

अर्जदार

R. Gharodiya

..............................

रोशनी सचिन घारोडीया

गैरअर्जदार

१) नितीन घारोडीया
------------------

नितीन नामदेव घारोडीया

C.F.N.A.

२) उर्मिला घारोडीया
------------------

श्रीमती उर्मीला नामदेवसिंग घारोडीया

C.F. Applicant

## सत्यापन

मी **रोशनी सचिन घारोडीया** वय 33 वर्षे, धंदा - गृहिणी,**राहणार: पांढरी-गायमुख, तहसिल नरखेड जिल्हा नागपूर** प्रतिज्ञार्थी शपथेवर सांगते की, वरील परिच्छेद मध्ये दिलेली माहिती माझे माहिती व विश्वासानुसार सत्य व बरोबर आहे. माझ्या सांगणेनुसार लिहिण्यात आलेले असुन वाचून बघितले माझ्या सांगण्यानुसार बरोबर आहे. करीता आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी नरखेड मुक्कामी सही केली.

R. Gharodiya

प्रतिज्ञार्थी

(V. M. Kshirsagar)
I know the applicant

(3)

...day of 16 04 2026 by Roshani Sachin Gharodiya, Age-34 yrs R/o Pandhari Gaimukh ...
who is personally known to me (or) who has been identified by Adv. V. M. Kshirsagar Tah. Narkhed
whose signature(s) are here to appended. Contents explained and admitted to be correct.

16.04.2026